# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०३/०६/२०२४ (सोमवार) दुपार**

---

## पोस्टे अरोली हद्दीतील तांडा येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमावर कायदेशिर कार्यवाही

दिनांक ०२/०६/२०२४ रोजी पोस्टे अरोली येथील स्टाफ पोस्टे परिसरात प्रोव्हिशन रेडकामी फिरत असताना मुखबिर कडुन विश्वसनिय खबर मिळाली कि, अरोली हद्दीतील तांडा येथे १ इसम मोहाफुल हातभट्टी ची दारु गाळत आहे. अशा खबरे वरुन तांडा येथे राहणारा मोहाफुल गावठी दारू गाळणाऱ्या इसमावर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे– ढेमन भैयालाल तांडेकर वय ५५ वर्ष रा. तांडा ता. मौदा** हा मोरगाव शेतात शिवारातील सुर नदीला लागुन असलेल्या आपले शेतावरील झोपडीमध्ये हातभट्टी लावुन मोहाफुल गावठी दारू गाळतांना दिसुन आला. दगड विटांचे चुलीवर लोखंडी ड्रम ठेवुन नळी द्वारे मोहाफुल गावठी दारुची रनिंग भट्टी काढतांना आढळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) दोन काळया रंगाच्या रबरी टयुब मध्ये प्रत्येकी २० लीटर प्रमाणे ४० लीटर मोहाफुल गावठी दारू किंमती ५०/– रू लीटर प्रमाणे एकुण किंमती २,०००/– रू. २) २१ नग प्लास्टिक चुंगडीमध्ये प्रत्येकी ५० किलो प्रमाणे एकुण १०५० किलो मोहाफुल सडवा रसायन (प्रति किलो २०० रू. प्रमाणे ) एकुण किंमती ५२,५००/– रू. ३) एक काळया रंगाचा लोखंडी ड्रम किंमती १००/– रू. ४)एक जर्मन घमेला किंमती २००/– रू. ५) एक दारू काढण्याचा लाकडी सास्या किंमती ५० /– रू. ६) एक दारू काढण्याचा प्लास्टिक पाईप किंमती ००/– रू. एकुण ५४,८५०/– रू. चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. आरोपी विरुद्ध पो.स्टे अरोली येथे कलम ६५ (एफ), (सी), (ई), (ब) महाराष्ट्र दारुबंदी अधिनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री हर्ष पोद्दार पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा.), मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधिक्षक नागपुर (ग्रा) यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे अरोली येथील ठाणेदार सपोनि. निशांत फुलेकर, पोहवा संदीप बाजनघाटे, पोशि मनिश सुखदेवे, राकेश राऊत यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर